# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०६५८/२२/अ.क्र.४१८९/२५/०१**

**श्री. सुभाष विठ्ठल वारिक**
६०१, पवाई फोर्चुन को. ऑप. लि.,
म्हाडा बिल्डींग नं. १८, पवई विहार,
पवई, मुंबई-४०००२८

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता नगररचना**
**(अंमलबजावणी) जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
तळमजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
तळमजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनूपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता नगररचना (अंमलबजावणी) जी/उत्तर विभाग, श्री. नितीन र. पावडे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता जी/उत्तर विभाग यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनूपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. सुभाष वारीक यांनी दाखल केलेल्या दि.०८.०९.२०२० रोजीच्या जोडपत्र-अ नुसार २ मुद्द्यांची माहिती संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता नगररचना (अंमलबजावणी) जी/उत्तर विभाग यांनी दि.१८.०९.२०२० रोजी प्रतिसाद दिला असून उपरोक्त प्रतिसाद हा अपूर्ण असल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२० रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर तत्कालीन

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता जी/उत्तर विभाग यांनी मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखात पुनश्च कसोशीने शोध घ्यावा व सदर माहिती उपलब्ध झाल्यास त्याची छायांकित प्रत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी, असा निर्देश दिला असून त्याप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना प्रदान करण्यात आली. मात्र ती केवळ २ पृष्ठांची असल्याचा आक्षेप नोंदवित दि.१२.०४.२०२१ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर अपिलार्थी यांना कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली व आयोगाने महानगरपालिकेच्या सोबत द्वितीय अपिलांचा निपटारा घेण्याबाबत सुरू केलेल्या विशेष मोहिमेंतर्गत माहितीच्या तक्त्यासंदर्भात माहिती प्रदान केली असून याव्यतिरिक्त उर्वरित माहिती उपलब्ध नसल्याचे नमूद केलेले आहे. मात्र आज झालेल्या सुनावणीत यातील माहिती ही कदाचित Arbitrator Town Planning Scheme, 4th floor, kamani chambers, 32 R.K. Marg, Ballard Estate Fort, Mumbai 400001 येथे उपलब्ध असल्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता व जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थी श्री. सुभाष वारिक यांच्या जोडपत्र-अ संबंधीत प्राधिकरणाकडे त्यांच्याकडील उपरोक्त योजनेबाबत माहिती उपलब्ध असल्यास ती अपिलार्थी श्री. सुभाष वारिक यांचा जोडपत्र-अ संबंधितास प्रदान करण्याच्या सूचनेसह अग्रेषित करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra